संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९९/२०२३

महाराष्ट्र शासन/ अनिकेत कोकाटे

निशाणी क्र.१५

**MHOS090004182023**

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी शपथेवर सुरू</u>...

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख-याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव : राहुल परसराम हजारे**.

**वय** **:** २८ वर्षे,

**व्यवसाय** **:** ड्रायव्हर,

**पत्ता** **:** रा. हावरगाव , ता. कळंब, जि. धाराशिव.

<u>साक्षीदार क्र.१ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. टी. वैद्य यांचे मार्फत</u>

१. मला २०/१२/२०२२ रोजी कळंब पोलीसांनी कळंबहून गावाकडे चाललो असताना खोंदला पाटी येथे थांबवले. पोलीसांनी मला थांबवून माझी पंचनाम्यावरती सही घेतली. आता मला अभिलेखावरील पंचनामा दाखविण्यात आला. त्यावरती **अनुक्रमांक १** वरती माझी सही आहे. सदरच्या सहीस **<u>निशाणी क्रमांक १६</u>** देण्यात येत आहे. ज्या कागदावर पोलीसांनी माझी सही घेतली त्या कागदावरील मजकूर मला माहित नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, हावरगाव शिवार येथे डी.डी.एन. हा साखर कारखाना आहे. हे म्हणणे खरे नाही की, डी.डी.एन साखर कारखान्याच्या बाजुला हॉटेल राजे हे आहे. हे म्हणणे खरे नाही की, २०/१२/२०२२ रोजी २०:२५ वाजता पोलीसांनी मी व दुसरा पंच नामे रामहरी घुले यांच्या समक्ष हॉटेल राजेमध्ये छापा टाकला असता तिथे दोन इसम बेकायदेशीररित्या दारू विकत असताना मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष त्या इसमांचे नाव विचारले असता त्यांनी १)अनिकेत आगरचंद कोकाटे व २) आगरचंद दत्तात्रय कोकाटे असे सांगितले.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या सामानाची झडती घेतली असता १) देशी दारू राज संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. च्या काचेच्या ०३ बॉटल प्रत्येकी प्रति बॉटल विक्री किं. ७०/-रू. प्रमाणे एकुण २१०/- रू. २) देशी दारू टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली.च्या काचेच्या ०२ बॉटल प्रति बॉटल विक्री किं. ७०/-रू. प्रमाणे १४०/- रू. ३) किंग फिशर कंपनीच्या ६५० मि.ली.च्या काचेच्या ०३ बॉटल प्रत्येकी प्रति बॉटल विक्री किं.१८५/- रू. प्रमाणे ५५५/- रू. असे एकुण ९०५/-रू. किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, त्या मुद्देमालापैकी रासायनिक विश्लेषणासाठी १८० मि.ली. क्षमतेच्या एका काचेच्या बाटलीमध्ये पंचाच्या सह्या करून सीलबंद करून तपासकामी जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पोलीसांनी जप्ती व घटनास्थळ पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदरचा पंचनामा

मला वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा वाचून दाखविल्यानंतरच त्यावरती माझी सही घेतली.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ व २ हे माझ्या गावात राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ हे हॉटेल राजे येथे बेकायदेशीर देशी व विदेशी दारूचा चोरटा विक्री व्यवसाय करतात. आरोपी क्र. १ व २ हे माझ्या ओळखीचे असल्याने त्यांना गुन्ह्यातून वाचविण्यासाठी आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे सन्माननीय विधीज्ञ बी. एच. वाघमोडे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**सही/-**

**दिनांक: २८.०३.२०२५** **(श्रीमती ए.डी. जाधव)**

**ठिकाण: कळंब** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**

**(कोर्ट क्र.४)कळंब.**